महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम
शुक्रवार, दिनांक १६ मार्च, २०१८

(सकाळी १०.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

(१) मुख्यमंत्री : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **नगरविकास विभागाचा** सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

(२) महसूल मंत्री :

(क) महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) (सुधारणा) नियम, २०१७ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक गौखनि-१०/०२१५/ प्र.क्र.९२/ख, दिनांकित १२ जानेवारी, २०१८ सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) (सुधारणा) नियम, २०१७ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक गौखनि-१०/०३१६/प्र.क्र.४७२/ख, दिनांकित १२ जानेवारी, २०१८ सभागृहासमोर ठेवतील.

(३) जलसंपदा मंत्री :

(क) राज्यपाल महोदयांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने सन २०१८-२०१९ च्या वार्षिक आखणीच्या नियोजनाबाबतचा तपशील सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(ख) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **जलसंपदा विभागाचा** सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

(४) वस्त्रोद्योग मंत्री : महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ व महामंडळाची उपकंपनी दि प्रताप स्पिनिंग, विव्हींग व मॅन्युफॅक्चरिंग कंपनी मर्यादित, अमळनेर यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा अनुक्रमे एकावन्नावा व एकशे सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

तीन : लोकलेखा समितीचा चौतिसावा अहवाल सभागृहास सादर करणे.

चार : विनंती अर्ज समितीचा अहवाल सादर करणे :-

"सिन्नर तालुक्यातील (जि.नाशिक) गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन योजनेस कर्जमाफी मिळणेबाबत" या विषयावरील **श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.** यांच्या विनंती-अर्जावरील विधानसभा विनंती-अर्ज समितीचा अहवाल मा.कार्यकारी समिती प्रमुख सभागृहात सादर करतील.

पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(गुरुवार, दिनांक १५ मार्च, २०१८ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते ३)

(१) **सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, मो. आरिफ नसीम खान, अमित देशमुख, अमिन पटेल, त्र्यंबकराव भिसे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. अब्दुल सत्तार, संग्राम थोपटे, राहुल बोंद्रे, ॲड. राहुल कुल, श्री. भारत भालके, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. संजय शिरसाट, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, संदीप नाईक, राजेश टोपे, जयदत्त क्षीरसागर, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, राणाजगजीतसिंह पाटील, राहुल जगताप,**

श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री. प्रदीप जाधव-नाईक, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, दत्तात्रय भरणे, मकरंद जाधव-पाटील, विजय भांबळे, भाऊसाहेब पाटील-चिकटगांवकर, संग्राम जगताप, सुरेश लाड, राहुल मोटे, संजय कदम, हनुमंत डोळस, दिपक चव्हाण, पंकज भुजबळ, डॉ. सतीश पाटील, श्री. बाळासाहेब पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-

"औरंगाबाद शहरातील तब्बल अडीच हजार टन साचलेला कचरा, शहरातील कचरा डेपो, कचरा कुंड्याही भरुन वाहू लागणे, नारेगाव, मांडकी, पळशी यासह १५ ते २० गावातील नागरिकांनी कचरा डेपोच्या विरोधात दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजीपासून सुरु केलेले आंदोलन, कचरा डेपो हटवण्याची होत असलेली मागणी, शहरातील कचरा डेपोवर साठून राहिलेला ५ दिवसांचा कचरा, शहरात दुर्गंधी पसरण्याचा निर्माण झालेला धोका, झोपडपट्टी भागात दोन लाख मास्क वाटणे, महानगर पालिकेतील डॉक्टरांच्या सुट्टया रद्द करणे, यासारखी खबरदारीची करण्यात आलेली उपाययोजना, गावकऱ्यांनी दिलेल्या इशाऱ्याकडे प्रशासनाने केलेले दुर्लक्ष, औरंगाबाद महानगरपालिकेचा निष्काळजीपणा, पर्यायी जागा शोधण्यास पालिकेला आलेले अपयश, सदर गंभीर परिस्थितीकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **डॉ. राहुल पाटील, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"परभणी शहरातील एकूण १४९ सर्व्हे नंबर मधील १४७६-२४ एकर जमिनीवर निजामकाळात अनेक बांधकामे झालेली असणे, या बांधकामाचे हस्तांतर नोंदणीकृत झालेले असणे, सदर जमिनीवर नविन बांधकामे अथवा दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांनी परभणी महानगरपालिका यांचेकडे केलेली असणे, जिल्हाधिकारी, परभणी यांच्या कार्यालयात महसूल, महापालिका, नगररचना या विभागाच्या अधिका-यांच्या बैठकीत उक्त सर्व्हे नंबरमधील बांधकामे/ दुरुस्त्या याबाबत कोणतीही चर्चा अथवा निर्णय न होणे, असे असतांनाही परभणी महानगरपालिकेतर्फे वरील बैठकीत परभणी जिल्हाधिका-यांनी तोंडी आदेश दिले आहेत असे कारण दर्शवून बांधकाम व दुरुस्त्यांना परवानगी देण्याचे काम बंद करण्यात येणे, जमिनी नागरिकांच्या नावावर असल्याबाबत पुरावे असूनही ते ग्राहय न धरणे, यामुळे गेल्या तीन वर्षात तेथील खरेदी विक्री चालू असली तरी नागरिकांना नविन बांधकामांना, फेरफारांना व महानगरपालिकेची परवानगी न मिळणे, परिणामी बँकातर्फे रहिवाशांना कर्ज न मिळणे, गेल्या तीन वर्षात या संदर्भात स्थानिक नागरिकांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद, जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त, परभणी; उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, जिल्हा भूमि अभिलेख इत्यादी कार्यालयांकडे लेखी निवदेनाद्वारे करण्यात आलेली मागणी, याबाबत स्थानिक

लोकप्रतिनिधींनी देखील जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांचेशी केलेला पत्रव्यवहार, तथापि, यावर अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नसणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, जमिनीचे सर्व व्यवहार ठप्प होऊन परभणी शहराचा खुंटलेला विकास, त्यामुळे या संदर्भात नविन बांधकामांना परभणी महानगरपालिकेतर्फे परवानगी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, सर्वश्री. हसन मुश्रीफ, जयंत पाटील, श्रीमती सुमन पाटील, श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कोल्हापूर जिल्हयातील आजरा, भूदरगड, राधानगरी, गगनबावडा, चंदगड व शाहूवाडी तालुक्यामध्ये गवारेडे व हत्तींमुळे शेतीचे मोठया प्रमाणात झालेले नुकसान, आजरा तालुक्यामध्ये विशेषत: आजरा, पेरेणोली, गवसे, देवर्डे, किटवडे परिसरामध्ये कर्नाटक व सिंधुदुर्ग जिल्हयातून ४ ते ५ जंगली हत्ती गत वर्ष ते दीड वर्षे वास्तव्यास असून या हत्तींमुळे विस्कळीत झालेले जनजीवन, हत्ती व गवारेडे यांच्याकडून भात, ऊस, केळी, काजू बाग, नाचणी, भुईमुग, वर्णा व हरभरा यासह अन्य पिकांचे नुकसान टाळण्याकरीता शेतकऱ्यांनी शेतामध्ये माचा (खोप) तसेच सिमेंटचे पोल उभारुन तारेचे कंपाऊंड करुन शेतीचे केलेले संरक्षण, हत्ती व गवारेडे यांच्या हल्ल्यामुळे गत १० वर्षामध्ये ३० हून अधिक शेतकऱ्यांचा तसेच वर्षभरापूर्वीच आकुर्डे (ता.भूदरगड) येथील स्थानिक पत्रकार श्री.रघुभाई शिंदे व शेतकरी अनिल पोवास यांचा गव्याच्या हल्ल्यामध्ये झालेला मृत्यु, वन विभागाकडून मिळणाऱ्या नुकसान भरपाईच्या रक्कमेमध्ये राधानगरी, भूदरगड व आजरा तालुक्यात असणारी तफावत, नुकसान भरपाई देण्याच्या संदर्भातील शासन निर्णयामध्ये केळी, हरभरा व वर्णा (पावटा) या पिकांचा तसेच शेतातील नांगर, बैलगाडी, पाण्याचा पाईप, शेतातील प्लॅस्टीकची पाण्याची टाकी, सिमेंट खांब इत्यादींचा नसलेला समावेश, शासनाकडून मिळणारी तुटपुंजी रक्कम तसेच कागदपत्रे सादर करुनही नुकसान भरपाई न मिळणे, हत्ती पकडण्यासाठी सावंतवाडीच्या धर्तीवर "हत्ती पकड मोहिम" राबविण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीनुसार वन्यजीव विभागाकडून ६२ लाख रुपये मंजूर होऊनही अद्याप कर्नाटकातील हत्ती पकडणारे प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध न होणे, याबाबत शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुनही कोणतीही कार्यवाही न होणे, राधानगरी, भूदरगड व आजरा हे तिन्ही तालूके अभयारण्याशेजारी असल्यामुळे वन्यप्राण्यांद्वारे केल्या जाणाऱ्या नुकसानीचे प्रमाण अधिक असून नुकसान भरपाईची प्रकरणे वेळेत मंजूर होत नसल्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, वन्यप्राण्यांकडून होणारे नुकसान टाळण्याकरीता सौर उर्जेवरील अथवा विजेवरील सौर कुंपनाकरीता शेतकऱ्यांना शासनाने अनुदान देऊन गवारेडे व हत्तींना मारण्याची परवानगी द्यावी अथवा गवारेड्यांच्या प्रजनन क्षमतेवर (कुंटुब नियोजन) मर्यादा आणण्याची होत असलेली मागणी, राधानगरी, भूदरगड व आजरा तालुक्यातील ३५ हजार हून अधिक कुटुंबियांना वन विभागाकडून देण्यात येणारे गॅस कनेक्शन निधी अभावी प्रलंबित असणे, याबाबत

शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

सहा : सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान. (दुसरा दिवस)

(१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.

(२) अल्पसंख्याक विकास विभाग.

(३) मराठी भाषा विभाग.

(४) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग.

(५) मृद व जलसंधारण विभाग.

(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)

(गुरुवार, दिनांक १५ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

सात : ॲड राज पुरोहित, श्री शंभुराज देसाई, ॲड॰ पराग अळवणी, श्री. ज्ञानराज चौगुले, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. जयप्रकाश मुंदडा, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. सुभाष साबणे, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री. अनिल कदम, पास्कल धनारे, किशोर पाटील, संजय केळकर, राजाभाऊ वाजे, उन्मेश पाटील, वैभव नाईक, डी. मल्लिकार्जून रेड्डी, अनिल बाबर, डॉ. राहुल आहेर, प्रा.चंद्रकांत सोनवणे, सर्वश्री महेश चौघुले, राजन साळवी, प्रा. मेधा कुलकर्णी, सर्वश्री. सुनिल प्रभु, बाबुराव पाचर्णे, उदय सामंत, राजेंद्र पाटणी, चंद्रदीप नरके, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री भरतशेठ गोगावले, समीर कुणावार, मनोहर भोईर, विकास कुंभारे, अजय चौधरी, डॉ. देवराव होळी, सर्वश्री. सुनिल शिंदे, राजू तोडसाम, मंगेश कुडाळकर, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री सुभाष भोईर, किसन कथोरे, प्रकाश आबिटकर, सुरेश भोळे, प्रकाश फातर्पेकर, प्रशांत बंब, उल्हास पाटील, नरेंद्र पवार, नारायण पाटील, बाळासाहेब मुरकुटे, अशोक पाटील, सुधाकर भालेराव, हेमंत पाटील, अमित साटम, शांताराम मोरे, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-

"राज्यात मुंबई, कोकण भागात लाभलेला लांब व निसर्गरम्य समुद्र किनारा, समुद्राच्या सान्निध्यातील रॉक गार्डन, समुद्राखालील प्रवाळे व जीवसृष्टीचा आनंद लुटण्यासाठी असलेले स्कूबा डायव्हिंग व स्नार्कलिंग, छत्रपती श्री शिवाजी महाराजांची पवित्र स्मृती व शूर वीरांचा

पारंपारिक इतिहास असलेले शिवनेरी, रायगड, सिंधुदुर्ग, तोरणा, मुरूड-जंजीरा, लोहगड, विजयदुर्ग, दुर्गाडी इत्यादी पुरातन व ऐतिहासिक किल्ले व जयगड, सिंहगड, प्रतापगड, माऊली इ. गड यांचे संवर्धन करण्याची आवश्यकता, दर्यासारंग सरखेल श्री. कान्होजी आंग्रे यांच्या पवित्र स्मृती जपण्याची आवश्यकता, औरंगाबादमधील जगप्रसिद्ध अजिंठा व वेरूळ लेणी व गुंफा अत्यंत जुन्या झाल्या असल्याने त्यांचे संवर्धन व पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने तेथे अत्याधुनिक योजना राबविण्याची आवश्यकता, संतभूमी महाराष्ट्रातील पंढरपुरचे विठ्ठल-रखुमाई मंदिर, कोल्हापुरचे महालक्ष्मी मंदिर, तुळजापुरचे भवानीमाता मंदिर, शिर्डीचे साईबाबा मंदिर, अष्टविनायक, शनिशिंगनापूर, भारतातल्या १२ ज्योतिर्लिंगापैकी महाराष्ट्रातील चार ज्योतिर्लिंगे, नाशिकमध्ये होणारा कुंभमेळा, आषाढी एकादशी निमित्त राज्यातून विविध ठिकाणांहून पंढरपूरच्या वारीकरिता पायी निघणारे व दिवसेंदिवस प्रवास करणारे वारकरी यांना वारीच्या मार्गात सुविधा पुरविण्याकरिता नियोजन करण्याची आवश्यकता, विदर्भातील ताडोबा, नवेगाव, बोर व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय अभयारण्य व तेथील राष्ट्रीय प्राणी व समृद्ध वनसंपदा, नागपूरमधील दीक्षाभूमी, देशाची औद्योगिक राजधानी म्हणून ख्याती पावलेले मुंबई शहर, मुंबईतील पुरातन कोळी संस्कृती तसेच फिल्म जगतात बॉलीवूड म्हणून प्रसिद्ध असलेली मुंबईची फिल्म नगरी, मुंबई शहरात असलेले जागतिक व्यापार केंद्र, श्री मुंबादेवी, श्री महालक्ष्मी, श्री सिद्धीविनायक इत्यादी प्रसिद्ध दैवते, देवी माऊंट मेरी, हाजीअलीचा दर्गा, पारशी समाजाची मंदिरे, श्री गोडीजी व श्री शांतीनाथ मंदिर, चैत्यभूमी इत्यादी विविध धर्माच्या भाविकांची श्रद्धास्थाने, तसेच गेट वे ऑफ इंडिया, मरिन ड्राईव्ह, नरिमन पॉईंट, बॅलार्ड पिअर, ससून डॉक, छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक, मुंबई महापालिका इमारत, हुतात्मा चौक, काळाघोडा, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, विज्ञान भवन, एशियाटिक लायब्ररी, मुंबई विद्यापीठ, हॉर्नीमन सर्कल या ऐतिहासिक वास्तू इत्यादींचे संवर्धन व जतन करण्याची आवश्यकता, दिल्ली बोट क्लब येथून २६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनादिवशी निघणा-या परेडच्या धर्तीवर मुंबईतील मरीन ड्राईव्ह ते नरीमन पॉईंटपर्यंत प्रतिवर्षी २६ जानेवारी रोजी काढण्यात येणारी भव्यदिव्य व नेत्रसुखद परेड, शैक्षणिक नगरी पुणे शहरातील पुरातन व नावाजलेल्या शिक्षणसंस्था, पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या नयनरम्य पर्वतरांगा, महाराष्ट्र राज्य पर्यटन क्षेत्रात देशभरातील प्रथम क्रमांकाचे राज्य बनविण्याच्या दृष्टीने व महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा वृध्दींगत करण्याकरिता नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखण्याची आवश्यकता ज्यायोगे देशभरातील व जागतिक स्तरावरील पर्यटक महाराष्ट्र राज्यात आकर्षित होऊन राज्यातील हॉटेल्स उद्योग, वाहतूक उद्योग यामध्ये वृद्धी होऊन लाखो बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल त्याचप्रमाणे राज्याच्या महसूलात वाढ होईल या दृष्टीने राज्य शासनाचे पर्यटन धोरण बनविण्याची आवश्यकता, मत्स्य उत्पादन दिवसेंदिवस कमी होत असल्यामुळे लहान आणि पारंपारिक मच्छिमारी करणा-यांवर आर्थिक संकट, कोकणातील व समुद्र किनारपट्टीतील मच्छिमारांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्याकरिता मत्स्य शेती वाढविण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(गुरुवार, दिनांक १५ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

आठ : **सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री भास्कर जाधव, अब्दुल सत्तार, गोपालदास अग्रवाल, मो. आरीफ नसीम खान, सुनिल केदार, दिलीप सोपल, मधुकरराव चव्हाण, ॲड॰ यशोमती ठाकूर, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री. अमिन पटेल, डि. एस. अहिरे, राहुल मोटे, डी. पी. सावंत, हसन मुश्रीफ, बसवराज पाटील, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, नितेश राणे, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, रणजित कांबळे, डॉ. संतोष टारफे, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशिराम पावरा, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, अमर काळे, अमित झनक, कु. प्रणिती शिंदे, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री भाऊसाहेब कांबळे, शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री अस्लम शेख, त्र्यंबकराव भिसे, जयकुमार गोरे, भारत भालके, सिध्दाराम म्हेत्रे, पांडुरंग बरोरा, कालिदास कोळंबकर, राहुल जगताप, नरहरि झिरवाळ, अमित देशमुख, प्रदिप जाधव-नाईक, धैर्यशिल पाटील, श्रीमती सुमन पाटील, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील कायदा व सुव्यवस्था नियंत्रणाबाहेर गेल्यामुळे गुन्हेगारांना कायद्याचा व पोलिसांचाही धाक नसणे, पोलिसांवर वारंवार होणारे हल्ले, मोकाट सुटलेले सायबर गुन्हेगार, आर्थिक अडचणीमुळे पोलिसांच्या घराचा प्रश्न अधांतरी असणे, उपनगरीय गाड्यांमध्ये महिला प्रवाशांवर होणारे हल्ले व विनयभंगाचे वाढते प्रमाण, पेट्रोल चोरीचे आधुनिक तंत्र, पोलीस दलातच महिला पोलिसांवर त्यांच्या वरिष्ठांकडून होणारे अत्याचार, उच्चभ्रू वर्गात अंमली पदार्थांचा वाढता वापर, लोकप्रतिनिधींच्या पत्रांना उत्तर अथवा माहिती अधिकार कायदयानुसारही माहिती न मिळणे, त्यातून सामान्यांची होणारी उपेक्षा तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यांवर पोलिसांचे हल्ले व माहिती देण्यास नकार, अनधिकृतपणे राज्यात सुरु असलेल्या सुरक्षा एजन्सीज, अल्पवयीन मुली व मुले यांच्यावर होणाऱ्या अत्याचारात झालेली वाढ, दरोड्याचे वाढते प्रमाण, वारंवार होणाऱ्या घरफोडी, रस्त्यावरील वाहन अपघातांचे वाढते प्रमाण, त्यात होणारी जिवीत व वित्तहानी, जातपंचायतीचा वाढता प्रभाव, भीमा-कोरेगावसारख्या घटनांमुळे दलितांमध्ये निर्माण झालेली दहशत व भीतीचे वातावरण, प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे जागेवर बसूनच वाहने प्रमाणित करण्यात येणे, वाहतुकीची मोठ्या प्रमाणात होणारी कोंडी, नियम डावलून वाहनयोग्यता प्रमाणपत्राचे वितरण, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (अनुसूचित जाती/जमाती) उद्योगासाठी विशेष सामूहिक प्रोत्साहन भत्ता योजनेची प्रभावी अंमलबजावणी न होणे, वारंवार तोट्यात चालणारे एस.टी. महामंडळ, मोडकळीस आलेल्या बसेस, परिणामी प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात येणे,

अनावश्यक बुलेट ट्रेन व हायपरलुप सारख्या दिवास्वप्नांनी जनतेला घातलेली भुरळ, सागरी सुरक्षा व्यवस्थेकडे झालेले दुर्लक्ष, सागरी आयुक्तालयाची प्रलंबित मागणी, कोकणातील बंदरांचा विकास करण्याकडे झालेले दुर्लक्ष, परिणामी कोकणवासीय जनतेत शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष, राज्यात आयोजित केलेल्या मॅग्नेटिक महाराष्ट्र परिषदेच्या माध्यमातून १२ लाख १० हजार ४६४ कोटी रुपये गुंतवणुकीचे ४ हजार १०६ सामंजस्य करार झाले असल्याचा शासनामार्फत करण्यात आलेला दावा, तथापि, प्रत्यक्षात हे सर्व करार म्हणजे दिखाऊपणा असल्याचे निदर्शनास येणे, "मेक इन इंडिया" च्या धर्तीवर महाराष्ट्रात स्थापन करण्यात आलेली "मेक इन महाराष्ट्र" परिषद, तथापि, राज्यात गुंतवणूक वाढण्याऐवजी उद्योजकांनी आपली गुंतवणूक काढून घेणे, यावरुन मेक इन महाराष्ट्र ते मॅग्नेटिक महाराष्ट्र हा एक प्रकारे आभास निर्माण केला असल्याचे निदर्शनास येणे, महाराष्ट्रात सन २०२५ पर्यंत एक लाख कोटी डॉलरची अर्थव्यवस्था बनविण्याचे स्वप्नचित्र शासन बघत असताना कारखानदारीकडे दुर्लक्ष झाल्याची खंत महिंद्रा अँड महिंद्राच्या व्यवस्थापकांनी व्यक्त करणे, विविध प्रकारच्या जाचक अटींमुळे राज्यातील उद्योग बंद पडून बेरोजगारांच्या संख्येत झालेली वाढ."

अशासकीय कामकाज

(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

नऊ : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-

(दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले परंतु पुढे ढकलण्यात आलेले अशासकीय ठराव) (क्रमांक १ ते ३)

(१) **श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३३५**

"राज्यातील वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स. यांचा ठराव क्र. २५९**

"राज्यामध्ये कोटयवधी रुपये खर्च करुन ग्रामीण भागामध्ये शासनाने तयार

केलेल्या अनेक प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना वर्षानुवर्षे बंद असल्याने त्या योजना चालू करण्याच्या दृष्टीने शासनाला उपाययोजना सुचविण्यासाठी दोन्ही सभागृहाच्या १५ सदस्यांची समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **श्री. राहुल मोटे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २२८**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्य लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १५ मार्च, २०१८

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.